



### अंतर्ज्ञानी बाबा

आपला एक भक्त लोहाराची कन्या आगीत पडली म्हणून तिला वाचवण्यासाठी बाबा आपला हात अग्नीदेवतेला अर्पण करू लागले.

जानेवारी ६० पैसे १९[illegible]

# अनुक्रमणिका – जानेवारी १९७६


| | |
|---|---|
| १) सप्रेम नमस्कार वि. वि. | संपादकीय |
| २) श्री मार्तंड म्हाळसापती नागरे | –श्री. चंद्रकांत सामंत |
| ३) श्रीसाईनाथ मंदिर, शिवाजी नगर | –श्री. सूर्यकांत गर्जे |
| ४) भक्त धन्ना जाट | –डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ५) कवी घनानंद | –श्री. विनायक पाठक |
| ६) श्रीसाईबाबांचा आगळा अनुभव | –श्री. अनंत पै काणे |
| ७) वाऱ्यावरचे विचार | –श्री. द. शं. टिपणीस |
| ८) जरी हे शरीर गेलो मी सोडून | –श्री. विलास वैद्य |
| ९) श्रीसाईनाथ चरित्र | –श्री. र. श्री. पुजारी |
| १०) स्वप्नी साईबाबा आले | –श्री. विजय हजारे |


# श्रीसाईलीला फेब्रुवारी १९७६ अंकाची झलक

- सुरत येथील श्री साईबाबा मंदिराचा सचित्र परिचय – श्री. चंद्रकांत सामंत.
- साईलीलेत शंभरावर लेख लिहिणारे वयोवृद्ध श्रीसाईभक्त – श्री. द. शं. टिपणीस यांचा परिचय – श्री. सदानंद चेंदवणकर.
- मी प्रत्यक्ष पाहिलेले श्रीसाईनाथ महाराज – श्री अनंत जयदेव चितांबर.
- श्रीसाईकृपेचा अनुभव – श्री. महादेव दत्तात्रेय भिडे.
- साईभक्त श्री. रघुनाथराव सांडभोर यांचे रेखाटलेले व्यक्तिचित्र.
- शिरडीची सफर – एक आगळा लेख – श्री. ना. बा. राऊत.

याशिवाय – श्री. चकोर आजगावकर, सौ. शांता सरोदे, मंगला राणे, गजू कुलकर्णी, एन्. आर. देशपांडे, इ. च्या साईभक्तीपर भावमधुर कविता, काव्य इ. इ.

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री साई वाक्सुधा

गुरू वर्षाकाळींचे घन ।
आवडी वर्षती स्वानंदजीवन ।
ते काय ठेवावें कोंडून
यथेच्छ सेवून सेववावें ॥१४॥

लेंकराची धरूनी हलुवटी ।
माय तयाच्या आरोग्यासाठीं ।
मायाळूपणें पाजी गुटी ।
तीच हातवटी बाबांची ॥१५॥
मार्ग तयांचा नव्हता गुप्त ।
कोण्या रीतीं कैसा अद्भुत ।
निजभक्तांचा हेतु पुरवित ।
सावचित्त ते ऐका ॥१६॥
धन्य धन्य सद्गुरू संगती ।
कोणा वर्णवे त्यांची महती ।
आठवितां एकेक तयांच्या उक्ती ।
निज स्फूर्ति उचंबळे ॥१७॥
प्रेमें करितां ईश्वरार्चन ।
गुरुसेवा गुरुपूजन ।
होईल गुरुसाम्य संपादन ।
इतर साधन तें फोल ॥१८॥

— श्रीसाईसच्चरित अध्याय १८ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे ] जानेवारी ७६ [ अंक १०

: संपादक :
**श्री. का. सी. पाठक,**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. १–२५ फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४७३६६१

संपादकीय

# सप्रेम नमस्कार वि. वि. —

इंग्रजी कालगणने प्रमाणे १९७६ साल आता सुरू झाले आहे. या शहात्तर सालातला हा श्रीसाईलीलेचा पहिला अंक वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. अनेक वाचकांची व भक्तांची श्रीसाईलीलेची वार्षिक वर्गणी जानेवारी पासून सुरू होते यावरून आम्हांस असे आता आनंदाने सांगावेसे वाटते की, श्रीसाईलीलेचे वर्गणीदार आता वाढत्या संख्येने आहेत. ही संख्या आणखीन वाढावी यासाठी सतत प्रयत्न चालू आहेत भक्तांनीही पण याकामी सहकार्य देऊन आमच्या प्रयत्नास हातभार लावावा ही विनंती. वाचकांना आवडेल, पटेल, व रुचेल असाच श्रीबाबांच्या संबंधीचा मजकूर यापुढे प्रत्येक अंकातून दिला जाईल.

यंदाच्या वर्षी श्रीसंत ज्ञानेश्वर यांची सातशेवी जयंती महाराष्ट्रभर साजरी झाली व तो जयंती सोहळा अद्यापही ठिकठिकाणी चालू आहे. शासकीय पातळी-वरून ठिकठिकाणी विविध कार्यक्रम उत्साहाने साजरे होत आहेत. ज्ञानोबा-रायांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरीची पारायणे झाली व त्यांनी जनतेसाठी ठेवलेला बहुमूल्य ठेवा सर्वांनी मनसोक्त लुटला आहे.

श्रीसंत ज्ञानोबारायांनी श्रीसाईबाबांच्या प्रमाणेच जनतेला भक्तीमार्गाची ओळख करून दिली. धर्मातील कठीण असे कर्मकांड बाजूला सारून परमेश्वराचे स्मरण केले तर इह-परलोकी कल्याण होते असे त्यांनी शिकविले. त्यांच्या या मार्गाकडे जनता आकृष्ट झाली. परमेश्वराच्या राज्यात उच्चनीच अशा भेदांना थारा नाहीं, जाती भेदाला जागा नाही. परमेश्वराची भक्ती करण्याचा सर्वांना अधिकार आहे. संत ज्ञानेश्वरांच्याच प्रेरणेने श्रीविठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढर-पूरची वारी करण्याची प्रथा सुरू झाली. त्यात अनेक संत मंडळीही सामील होती. संत चोखामेळा हेही इतर संतांसमवेत पंढरपूरला जात. तिथे संतांचा समता मेळाच भरत असे.

श्री ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' प्रसिद्ध आहेच याशिवाय त्यांनी 'अमृतानुभव' आणि चांगदेव पासष्टी या ग्रंथांची रचना केली. वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी त्यांनी आळंदी येथे जिवंत समाधी घेतली. तेव्हांपासून आळंदी हे क्षेत्र देखील वारकऱ्यांचे श्रद्धास्थान झालेले आहे. श्री साईलीलेला सर्वच संतांबद्दल अत्यंत आदर आहे. श्री ज्ञानेश्वरांच्या सातशेव्या जयंती निमित्त श्रीसाईलीला त्यांना अत्यादराने कोटी कोटी प्रणाम करीत आहे.

गांठीभेटी---१४

## बाबांना साईबाबा संबोधणाऱ्या श्रीम्हाळसापतींचे चिरंजीव

# श्री मार्तंड म्हाळसापती नागरे

**लेखक :- श्री. चंद्रकांत दामोदर सामंत**



श्री मार्तंड म्हाळसापती महाराज

श्रीक्षेत्र शिरडी येथें जाणारे भाविक सर्वसाधारणपणे श्रीबाबांचे गुरुस्थान, समाधिमंदिर, द्वारकामाई, चावडी, लेंडीबाग इत्यादी स्थानांना नियमित भेट देताना आढळतात. पण जाणकार लोक वरील स्थानांव्यतिरिक्त श्री खंडोबाचे देऊळ व त्याची व्यवस्था पाहणारे कै. म्हाळसापती पुत्र, मार्तंडभगत ह्यांचेही दर्शन सहसा चुकवित नाहींत. श्रीसाईनाथांचा शिरडीतला 'नामकरण' विधि ज्या देऊळात पार पडला त्या खंडोबाच्या देऊळाचे महत्त्व श्रीसाईभक्तांच्या दृष्टीनें फार मोठें आहे. खंडोबाचे देऊळ प्रवाश्यांच्या वाटेवरच असल्या कारणानें येता जाता त्याचे दर्शन सुलभपणे होऊ शकते. हे देऊळ फार पुरातन असून त्याची व्यवस्था वंशपरंपरागत नागरे घराण्याकडे आहे.

मार्तंड भगतांचे वडील थोर श्रीसाईभक्त कै. म्हाळसापती हे परमार्थातले एक चांगले अधिकारी पुरुष होऊन गेले. ते पूर्णपणे निरपेक्ष होते व त्यांच्याकडून भक्तमंडळींना नित्य बोध व आनंद मिळत असे. श्रीबाबांच्या हयातीत म्हाळसापतींचे स्थान त्यांच्या निकटवर्तियांपैकी होते तसेंच महाराजांच्या पश्चातही त्यांच्या भक्तांना ते एक विश्रांतिस्थान होते. भाद्रपद वद्य शके १८४४ मध्ये म्हाळसापती निधन पावले.

श्री. मार्तंडभगत ह्यांचा जन्म १८९० साली गोकुळअष्टमीच्या दिवशी झाला. त्याआधी म्हाळसापतींना पुत्ररत्न नव्हते. चार मुली होत्या. श्रीसाई-

बाबांच्या आशिर्वादाने जन्मलेल्या हृया मुलाला त्याच्या वयाच्या २५ वर्षापर्यंत जपण्यास श्रीबाबांनी म्हाळसापतींना सांगितले होते. बाळपणापासूनच मार्तंडांचा ओढा भक्तिमार्गाकडे होता. श्रीसाईनाथांच्या नित्य सहवासामुळे त्यांची त्या मार्गातील प्रगति झपाट्याने झाली. लहानपणी बालसुलभ कुतुहलाने मार्तंडभगत आपल्या वडिलांबरोबर नेहेमी मशिदीत जात, व तेथे आपल्या वाट्याला येणारी लहानसहान कामे मोठ्या हौसेने करीत. श्रीबाबांना पानविडा देणे, प्यावयास पाणी देणे, दात कोरण्यास काडया आणून देणे, त्यांच्याबरोबर खेळणे हा त्यांचा आवडता दिनक्रम होता. १९१० साली मार्तंडांचे लग्न झाले. मुलगी श्रीबाबांनीच पसंत केली होती. लग्नाच्या गावाहून वरात परतल्यानंतर मंडळी मशिदीत दर्शनास गेली असता "आपण लग्नाला उपस्थित होतो" असे उद्‌गार श्रीबाबांनी काढले.

कै. म्हाळसापती अतिशय निरपेक्ष व विरक्त वृत्तीचे होते. तोच वारसा मार्तंडभगत पुढे चालवित आहेत. ८५ वर्षे वय असुनसुद्धा त्यांच्या दिनचर्येत व ईश्वरसेवेत यत्किंचित्‌ही फरक पडलेला नाहीं. रोज सकाळी घरातील

व ईश्वरसेवेत यत्किंचितही फरक पड़लेला नाहीं. रोज सकाळी घरातील वडिलां-च्या समाधिच्या पुजेनंतर खंडाबाचे देऊळ, देवी वज्रेश्वरी, गुरुस्थान, समाधि-मंदिर, गणेशमंदिर, शनिमंदिर, महादेवमंदिर, द्वारकामाई, चावडी हृया स्थानांची क्रमाने ते पूजा करतात. पाच घरी भिक्षा मागणे, श्री बाबांना नैवेद्य दाखविणे, संध्याकाळी खंडोबाच्या देऊळात तेलवात लावणे हृया गोष्टी आजही त्यांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहेत.

श्रीमार्तंड हे श्रीसाईबाबा व म्हाळसापती हृया दोघांना आपल्या गुरुस्थानी मानतात. तेवढाच आदर त्यांना महाराष्ट्रातील एक विद्यमान संत परमपूज्य गजानन महाराज उर्फ अण्णासाहेब पट्टेकर ठाणे हृयांचेविषयी आहे. अपुऱ्या शिक्षणामुळे मार्तंडांना लिहिता येत नाहीं. तरी त्यांनी मराठीतल्या बहुतेक सर्व धर्मग्रंथांचे वाचन केले आहे. त्यांच्या संग्रही श्रीसाईनाथांनी वापरलेल्या काही वस्तु असून प्रसाद म्हणून मिळालेले तीन रूपये देव्हाऱ्यात नित्य पुजिले जातात.

श्रीसाईबाबांच्या उपदेशानुसार,

"येडागुंगा रहना,
किसी को ग्यान नहीं बताना,
कोई दस बात करे,
तो आप एक कहना,"

असे त्यांचे वर्तन असल्याकारणाने त्यांना शिरडीत नित्य जमणाऱ्या असंख्य भाविकांच्या गर्दीतून हुडकून काढणे व बोलते करणे सोपे नाहीं. तथापि वयो-

मानाने थकलेले असताही व दृष्टि बरीचशी अधु झालेली असूनही मार्तंडभगत त्यांच्या परिचित मंडळींशी दोन उपदेशपर शब्द बोलल्याखेरीज राहत नाहीत. त्यांच्या सहवासात असता त्यांच्या मुखातून निघणारी उपदेशपर सुभाषिते व संतवचने ऐकणे हा खरोखरच एक आनंददायक अनुभव आहे.

श्रीमार्तंड महाराजांच्या अधिकारात असलेल्या शिर्डीच्या श्री खंडोबा देवळात दरवर्षी चंपाषष्ठीचा उत्सव अतीव उत्साहाने साजरा होतो. यावेळी देवळासमोर २४ फूट लांब व १२ फूट रुंद असा खड्डा खणण्यात येतो. या खड्ड्यात चांगला रखरखीत जाळ तयार केला जातो व त्या जाळातल्या धगधगीत निखाऱ्यावरून श्री मार्तंड भगत चालत जाऊन श्रीखंडोबाचे दर्शन घेतात. त्यांच्या मागोमाग अनेक भक्त पण जातात परंतु यापैकी कुणासही कसलीच इजा होत नाही. याप्रसंगी श्रीखंडोबा व श्रीसाईबाबा यांच्या नावाचा जयजयकार होतो व सारा परिसर दुमदुमून जातो. या खंडोबा मंदिरातील विजेचे दिवे दिल्लीचे श्री साईभक्त श्री. मोहन चिटणीस यांनी दिलेले आहेत. या दिव्याच्या उद्‌घाटनाचा सोहळा ठाण्याचे श्री. गजानन महाराज उर्फ अण्णा-साहेब पट्टीकर यांचे हस्ते एका चंपाषष्ठीला पार पडला होता. याच देवळात श्रीसाईबाबांनी श्रीउपासनी बाबांना चार वर्षे ठेवले होते.

जुन्या व नव्या शिरडीमधील श्री. मार्तंड भगत हे एक महत्वाचा दुवा असून त्यांना आयुरारोग्य लाभून त्यांच्याकडून भक्तमंडळींना सदैव मार्गदर्शन घडो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना !

● ● ●

● श्रीसाईलीला दिवाळी अंक म्हणजेच स्वानुभव विशेषांकाची मागणी दूरदूरच्या वाचकांकडून अद्यापही येत आहे. परंतु, दादर किंवा शिर्डीच्या कार्यालयात श्रीसाईलीलेचा एकही अंक शिल्लक नसल्याने वाचकांनी अंकाची मागणी कृपया करू नये ही विनंती.

श्री साईभक्तांची श्रद्धस्थाने—१६

# श्री सद्गुरू साईनाथ मंदीर-शिवाजीनगर पुणे ५.

• श्रीं. सूर्यकांत माधवराव गर्जे, पुणे



श्री सद्गुरु साईनाथ मंदिर
शिवाजी नगर
येथल्या मंदिरातील
श्री बाबांची मूर्ती

पुणे शहरात प्रामुख्याने शिवाजी नगर स्वारगेट व खडकी या ठिकाणी श्री साईनाथ मंदीरे आहेत. यापैकी शिवाजीनगर येथील मंदीर सर्वात जुने असून त्याचा पूर्व इतिहास अत्यंत ज्वलंत व रोमहर्षक आहे. श्री साईनाथांचे हे मंदीर शिवाजीनगर भागातील रासने चाळीच्या आवारात मुठा नदीच्या तीरावर उभारलेले आहे. अलिकडे नदीचे पात्र व मंदीर यांच्यामधून एक नवीन सडक झाल्यामुळे पावसाळ्यात पुराचे पाणी मंदीराला चाटून जात नाहीं. मंदीराकडे जाण्यासाठी मुख्य रस्ता सोडून डाव्या बाजूला वळले की, रासने चाळ लागते. तसेच थोडे पुढे जाऊन उजव्या बाजूला तोंड फिरविले की, श्री साईनाथ महाराजांचे दर्शन घडते. आणि हरवले ते गवसल्याचा आनंद चेहऱ्यावरून ओसंडू लागतो. मंदीर शोधण्यासाठी घेतलेल्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटते.

श्री बाबांच्या समकालीन भक्तांपैकी श्री. दामोदरपंत रासने हे एक होत. शिवाजीनगर येथील रासने चाळ ही श्री बाबांच्या या भक्ताचीच चाळ होय. १९४५ च्या सुमारास श्री. दामोदरपंत रासने यांचे चिरंजीव श्री. नानासाहेब

रासने यांनी या चाळीतील दोन स्वतंत्र खोल्या घेऊन तिथे श्री. बाबांच्या फोटोची प्रतिस्थापना केली व तेव्हापासून तिथे श्री बाबांची उपासना सुरु झाली. दररोज संध्याकाळी आरती होऊ लागली. एक–एक करता करता अनेक भक्त जमू लागले. प्रामुख्याने त्यात पुण्याचे त्यावेळचे सेशन जज्ज श्री. पाटील, बेळगावचे जज्जसाहेब श्री. चौगुले, श्री. व्ही. शंकर मुदलियार, श्री. पी. एम्. राव, कै. रंगनाथन, श्री वेंद्रे, श्री. गायकवाड, श्री. ताकवणेगुरुजी ही मंडळी नियमितपणे येत असत. त्याच सुमारास श्री. नानासाहेब रासने यांनी खेडचे श्री. निकम यांना पाचारण केले. श्री. निकम परम साईभक्त होते. पोलीस खात्यामध्ये ते जमादार होते. त्यांनी नोकरीचा राजिनामा दिला व श्री. रासने यांच्या इच्छेप्रमाणे येथील साई-मंदीरासाठी स्वतःला वाहून घेतले.

श्री. निकम यांचा येथील श्री साईनाथ मंदीराशी खूप घनिष्ट संबंध होता. त्यांच्या पूर्व पुण्याईने त्यांच्याकडे श्री बाबांनी स्वतः दिलेला ताईत कसा आला ही हकिगत अतिशय विस्मयकारक आहे.

शिर्डी येथील काशीबाई नावाची एक मुलगी लग्न होऊन निफाडगावी गेली. अल्पावधितच तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. तिचा पती कालवश झाला. त्यावेळी तिला दिवस गेले होते. योग्य वेळी बाळंतपण झाले. तिला मुलगा झाला. मुलाचे नाव तिने माधव ठेवले. मुलगा एक वर्षाचा झाल्यावर ती निफाडहून शिर्डीला आपल्या माहेरी येऊन राहिली. घरची परिस्थिती गरीबीची असल्यामुळे तिला कुणाच्या तरी शेतावर जाऊन मोल-मजुरी करावी लागे. बाई सकाळीच माधवला कडेवर घेऊन मशिदीत येई. त्याला तिथेच सोडून ती कामाला जाई. दिवे लागणीला घरी परतताना ती मशिदीत येऊन माधवला घेई. श्री बाबांना नमस्कार करून घरी जाई. माधवची सर्व जबाबदारी बाबांच्यावर टाकल्यामुळे बाई दिवसभर निर्धास्त असे. हा नित्यक्रम कित्येक दिवस चालला होता. माधव ३।४ वर्षांचा झाल्यावर बाबा त्याला दररोज एक रुपया देऊ लागले. माधवहि बाबांची थोडी-फार कामे करीत असे. बाबा अनेकांना पैसे देत हे काशीबाईला माहित झाले.

एके दिवशी मशिदीत येऊन काशीबाई श्रीबाबांना म्हणाली, "बाबा, तुम्ही दररोज कुणाला ५० रु. तर कुणाला ३० रु., कुणाला २५ रु. तर कुणाला १५ रु. देत असता परंतु माझा माधव तुमची किती तरी कामे करतो आणि तुम्ही मात्र त्याला एकच रुपया देता असे का ?"

बाबा म्हणाले, "बाई, दुसऱ्यांना देणारे पैसे मी केव्हातरी बंद करीन परंतु तुला मात्र माझ्याकडून एक रुपया कायमचा मिळत राहील. मी तुझ्या-सारख्या अनाथ महिलेचा नाथ आहे."

यावर न समजून बाई एकदम उत्तरली "छे, माझे नाथ (पती) ५ वर्षा-पूर्वीच वारले."

तिचे हे चमत्कारिक उद्‌गार ऐकून बाबा तिच्यावर संतापले. बाबांचा तो रुद्रावतार पाहून बाई माधवला घेऊन मशिदीतून पसार झाली. या घटनेला २।३ दिवस झाले असतील नसतील तोच बाबांना एकदम काशीबाईची आठवण झाली. त्यांचा राग शांत झाला होता. त्यांनी काशीबाईला बोलावणे धाडले.

माधवला हाताशी धरून काशीबाई भीत भीतच मशिदीत आली. बाबांनी तिला जवळ बोलावले. बाबांचा एक दात हलत होता. तो बाबांनी हलकेच काढला. तो दात व थोडी उदी एका लहानशा चिंधीत गुंडाळून त्याचा ताईत केला व तो बाईजवळ देऊन तिला आशीर्वाद दिला व म्हणाले, "हा ताईत जवळ ठेव. अल्ला तेरा भला करेगा."

माधव आता मोठा झाला होता. माधव आता माधवराव झाले होते. आई निवर्तल्यावर माधवराव निफाडला येऊन राहिले होते. एकदा ते खूप आजारी पडले. अंथरुणाला अगदी खिळून होते. एके दिवशी झोपेत असताना त्यांना स्वप्न पडले. स्वप्नात बाबा येऊन त्यांना सांगत होते. –"तुझ्याकडे एक माणूस येईल. त्याला तुझ्या दंडात बांधलेला ताईत देऊन टाक." आणि नेमके त्याच दिवशी खेडहून श्री. निकम निफाडला श्री. माधवरावांचे घरी आले होते तेही योगायोगाने. तशा माधवराव आणि निकम यांच्या शिर्डीला अनेकदा गांठीभेटी झाल्या होत्या. श्री. निकम यानाहि तसाच दृष्टांत झाला होता आणि म्हणूनच ते तडक माधवरावांचे घरी आले होते. माधवरावांनी बाबांचा ताईत श्री. निकम यांच्या हवाली केला.

कालांतराने हाच ताईत निकम यांच्याकडून श्री साईनाथ मंदीराकडे आला आणि आज तो मंदीरातील श्री साईनाथ महाराजांच्या पादूकाखाली जतन करून ठेवला आहे. श्री साईनाथ मंदीराचे हे एक खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

१९५० साली मंडळ रजिस्टर्ड झाले व श्री साईदास मंडळ अस्तित्वात आले. मंडळाच्या चिटणीसपदावर श्री. रंगनाथन् अनेक वर्षे होते. त्यांच्या निधनानंतर चिटणीस पदाची सर्व सूत्रे श्री. एस्. रामकृष्णन् यांच्याकडे आली. ती आजतागायत त्यांच्याचकडे आहेत. मंदीराच्या उत्कर्षासाठी श्री. रामकृष्णन् यांनी जिवापाड कष्ट घेतलेले असून, आजहि वयाच्या ७४ व्या वर्षात त्यांच्या कामाचा उरक व उत्साह तरुणांना लाजविणारा आहे. दरवर्षी दसरा, रामजन्म व गुरू पौर्णिमा हे महोत्सव श्री. रामकृष्णन् यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात व अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडत असतात. मंदीराच्या प्रत्येक

लहान-मोठ्या गोष्टीत श्री. रामकृष्णन् जातीने लक्ष घालीत असतात. त्यांचा सल्ला केवळ मंडळालाच नव्हे तर इतर लोकानाहि उपयुक्त व मार्गदर्शक ठरत असतो. अशा या वृद्धातील तरुण श्री. एस्. रामकृष्णन यांच्याबरोबर कार्य करताना मंडळाच्या इतर सहकाऱ्यांना नेहमी आनंदच मिळत असतो.

श्री साईनाथ मंदीराच्या आवारात एक प्रशस्त सभागृह बांधण्याची योजना मंडळाच्या हाती असून कामाला लवकरच मूर्त स्वरूप येईल अशी आशा आहे.

श्री साईदास मंडळाचे आणखी एक स्फूर्तिदाते श्री. नानासाहेब अवस्थी हे होत. ८० वर्षांचे श्री. अवस्थीकाका श्री. बाबांचे परमभक्त असून, वयाच्या १६।१७ व्या वर्षी ते शिर्डीला प्रत्यक्ष श्री बाबांच्या सहवासात राहिले होते. गेली कित्येक वर्षे श्री. अवस्थीकाका न चुकता दर गुरुवारी सायंकाळी मंदीरात येऊन आरतीला उपस्थित रहात असतात. श्री बाबांचा वरदहस्त असलेले श्री. अवस्थीकाका मंदीराचे उध्वर्यु असावेत हे मंडळाचे सद्भाग्यच नव्हे काय ?

श्री साईनाथ मंदीराची आणखी एक ज्वलंत आठवण सांगितल्याशिवाय हा लेख पूर्ण होऊच शकत नाहीं. १२ जुलै १९६१ ला पानशेतचे धरण फुटले आणि पुण्यात हाहाकार उडाला. शिवाजीनगरचे श्री साईनाथ मंदीर तर नदीच्या तीरावर वसलेले. महापूर आला तेव्हा पाण्याची पातळी या मंदीराच्या वर २०।२५ फूट होती. पाण्याच्या अजस्त्र लोंढ्याबरोबर रासने चाळीतील घरे भुईसपाट झाली होती. मंदीराचे काय झाले असेल या चिंतेने मंडळाच्या सर्व लोकांना व भक्तांना ग्रासले होते. पुराचे पाणी ओसरल्यावर सर्वांनी मंदीराकडे धाव घेतली. मंदीरावर साठलेला मातीचा, चिखलाचा प्रचंड ढीग उपसण्याचे काम २।३ दिवस सातत्याने चालू होते, आणि आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला. मंदीर जसेच्या तसे होते ! पुराच्या तडाख्यातून सिमेंट कॉंक्रिटच्या इमारती सुटल्या नाहींत परंतु मंदीराला लागून असलेले औदुंबराचे झाड जसेच्या तसे उभे होते. चिखलात रुतून बसलेली एक श्री बाबांची रंगीत प्रतिमा जशी होती तशीच राहिली. पुराचा यत्किंचितहि परिणाम तिच्यावर झाला नाहीं. आजहि ती प्रतिमा मंदीरात श्री बाबांच्या मूर्तीच्या मागे भिंतीवर टांगून ठेवलेली आहे. श्री. बाबांच्या या प्रतिमेकडे पाहिले की मन अंतर्मुख होऊन नकळत मस्तक नत होते.

● ● ●

# 'भक्त-धन्ना जाट'

● डॉ. के. भ. गव्हाणकर

निष्काम कर्मयोगाने अगर ज्ञानाने मानवी जीवनाची पूर्तता होत नाहीं. भक्तीचे स्थान मानवी जीवनात सर्वांहून श्रेष्ठ आहे हे भगवंताच्या भूमिकेतच विशद झाले आहे. व्यासांनी संपूर्ण महाभारत लिहिले त्यास धर्म अधर्माचे साकल्याने विवरण करून जगाला आचार धर्मांचा उपदेश केला. "व्यासोच्छिष्टं जगत्रयं" अशी पदवी संपादन केली. जगात लौकिक झाला पण व्यासाचे हृदय मात्र शून्यच राहिले. मनुष्य जगापासून वस्तुस्थिती लपवील पण त्याला स्वतःपासून काहीं लपविता येईल कां ? व्यासांचे हृदय व्यासांना म्हणू लागले, "तू जगास अन्नदान केलेस पण मी उपाशीच आहे." व्यास सरस्वतीनदीच्या तीरावर एकान्तात बसले होते. एकान्त म्हणजे हृदयाचा आरसा-आरसाच होय. त्या आरशात त्यांना आपल्या हृदयाची भावशून्य मूर्ति दिसली, त्यांना काय करावे ते सुचेना. शेवटी त्यांचे नेत्री आसवे आली त्याक्षणी व्यासांच्या हृदयाची हाक ऐकणारी मूर्ति विणेच्या मधुर झंकारावर भगवंताचे गोड नाम गात तेथे प्रकट झाली. नारदाची मूर्ति पहाताच व्यासांचे हृदय अधिकच उचंबळले. प्रियजनांस पाहिल्यावर कोणास आपले दुःख लपविता येणार आहे ! नारदांनी व्यासांचे सांत्वन करून त्यांना भगवंताच्या सगुण कथा गाण्यास सांगितले व त्यानेच हृदयास समाधान मिळेल म्हणून आशीर्वाद दिला. व्यासांनी नारदाच्या सांगण्याप्रमाणे भगवद्‌भक्तांच्या कथा गाईल्या तोच भागवत ग्रंथ होय.

भक्ती ही सर्वांना साध्य आहे. तेथे सुष्ट, दुष्ट गरीब, श्रीमंत असा भेद-भाव नाहीं. प्रत्येक-नव्हे हीन जातीत सुद्धा भगद्‌भक्त निपजले आहेत. भगवत्‌-गुण, भगवल्लीला, व भगवन्नाम ज्याच्या चित्तवृत्तीतून सतत वहात असतात तो भक्तिचा अधिकारी आहे, व त्याच्या संकीर्तनाने व निष्काम शुद्ध प्रेमामुळे सर्वभावसंपन्नता प्राप्त होते. त्यामुळे भगवान प्रसन्न होतात.

भक्त धन्नाजी जाट हे हीन जातीत जन्माला आले होते. त्याचे वडील गरीब पण शुद्ध सरळ स्वभावाने आपला शेतीचा धंदा करीत होते. गरीबीमुळे धन्नाजीचे विद्याध्ययन किंवा शास्त्रश्रवण झाले नव्हते. तरी त्याचे हृदय प्रेमळ, दयाळू व कळवळधाने भरलेले होते. त्यांचे घरी साधुसंत वारंवार येत असत त्यामुळे त्याला चांगली संगत लागली होती व तेणेकरून परमेश्वराविषयीचा

जिव्हाळा सहज निर्माण झाला होता. भगवन्नामाचे अहोदिनरात्र सिञ्चन झाल्यामुळे त्याला परमेश्वराचा ध्यास लागला.

धन्नाजी पाच वर्षांचा असताना त्यांचे घरी एक भगवद्‌भक्त साधुब्राम्हण आला. त्याने विहिरीवर जाऊन स्वतः पाणी काढून स्नान केले व नंतर संध्या-वगैरे नित्यकर्म करण्याकरिता आसनावर बसला. पूजासाहित्य जवळ घेऊन पिशवीतून शाळीग्राम काढून पूजेकरिता ताम्हणात ठेवला. त्या शाळीग्रामाची षोडशोपचारे पूजा केली. चंदन, सफेत फुले, तुळशीदल, नैवेद्य धूपदीप दाखवून ध्यानस्थ बसला. नंतर भोजनाचा नैवेद्य दाखवून तो प्रसाद स्वतः ग्रहण केला. धनाजी हे सर्व मन लावून एकाग्र चित्ताने पहात होता.

सूक्ष्म मनात, प्राणात, चित्तात नितांत गूढ अशी शक्ति आहे. तिचा उदय धन्नाजी सरळ व भावीक असल्यामुळे झाला, व भक्तिभावनेचा सुंदर अंकुर फुटला. नयनाला प्रभुदर्शन व्हावे ही तीव्र लालसा उत्पन्न झाली. त्याला वाटले जर मला अशी मूर्ति मिळेल तर मीसुद्धा अशा तऱ्हेने पूजा करीन व भगवंताला पाहीन. लगेच त्याने आपल्या मधुर वाणीने त्या ब्राम्हणाकडे जाऊन विचारले की "पंडितजी ! आपणाकडे दुसरी एखादी अशातऱ्हेची मूर्ति आहे का ? असली तर मला द्या ! मीसुद्धा आपणासारखीच तिची पूजा करीन.

ब्राम्हणाने त्या बालकाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले, परंतु धन्ना त्यांचा पिच्छा सोडीना. ब्राम्हण बेचैन झाला व त्याने तेथील एक काळा दगड घेऊन त्याला दिला व म्हणाला 'बेटा ! हा पहा ! हा तुझ्याकरिता भगवान आहे. त्याची नित्यनियमाने पूजा करीत जा ! स्वप्रियता उदयाला आली की प्रभूत्व उदयाला आलेच पाहिजे. तो दगड पाहताच त्याचा कंठ दाटून आला. सर्व काया रोमांचित झाली व आनंदाश्रू गळू लागले. त्या दगडाला शाळीग्राम समजून मनःपूर्वक आनंद मग्न बसला, व हीच गुरुदक्षिणा समजून त्याची भक्ति-भावाने पूजा करावयाची असा संकल्प केला. त्याला खरा शुद्ध सत्संग लाभला.

भगवान श्रीकृष्ण स्वतः उद्धवाला सांगतात :–

**न रोधयति मां योगो न सांख्य धर्म एव च ।**
**न स्वाध्यायस्तपस्त्यागो नेष्टापूर्तं न दक्षिणा ॥**
**व्रतानि यज्ञश्छन्दांसि तीर्थानि नियमा यमा : ।**
**यथाऽवरुन्धे सत्संगः सर्वसंगापहो हि माम् ॥**
**सत्संगेन हि दैतेया यातुधाना मृगाः खगाः ॥**
**गन्धर्वाप्सरसो नागाः सिद्धाश्चारणगुह्यकाः ॥**
**विद्याधरा मनुष्येषु वैश्याः शूद्राः स्त्रियोऽन्त्यजाः ।**
**रजस्तमः प्रकृतयस्तस्मिंस्तस्मिन्युगेऽनघ ? ॥**

बहवो मत्पदं प्राप्तास्त्वाष्ट्रकायाधवादयः ।
वृषपर्वा बलिर्बाणो मयाश्चाथ विभीषणः ॥
सुग्रीवो हनुमानृक्षो गजो गृध्रो वणिक्पथः ।
व्याधः कुब्जा व्रजे गोप्यो यज्ञपत्न्यस्तथापरे ॥
ते नाधीतश्रुतिगणा नोपासितमहत्तमाः ॥
अव्रता तप्ततपसः सत्संगान्मामुपागताः ॥
केवलेन हि भावेन गोप्यो गावो नगा मृगाः ।
येऽन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरञ्जसा ॥
यं न योगेन सांख्येन दानव्रततपोऽध्वरैः ।
व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः प्राप्नुयाद्यत्नवानपि ॥

× × ×

तस्मात्त्वमुद्धवोत्सृज्य चोदनं प्रति चोदनं ।
प्रवृत्तं च निवृत्तं च श्रोतव्यं श्रुतमव च ॥
मामेकमेव शरणमात्मानं सर्वदेहिनाम् ।
याहि सर्वात्मभावेन मया स्या ह्यकुतो भयः ॥

(श्रीमद्भगवत् ११।१२)

धन्नाजीच्या आनंदाला सीमा उरली नाही, त्या दगडरूपी देवाला कधी आलिंगन द्यावे तर कधी कुरवाळून पोटाशी धरावे, कधी कधी तर डोक्यावर घेऊन नाचावें तर कधी डोळे भरून पहातच बसावे. असा आपला काळ आनंदात घालवीत असे.

तो नित्यनियमाने त्याची पूजा करी. सकाळीच उठल्याबरोबर स्नान घालावे चंदनाच्या ऐवजी नवीन चांगल्या मातीचा गंध म्हणून टिळा लावावा, कोणतीही झाडाची पाने, तुळशीदल म्हणून वहावे, बारीक बारीक दगड अक्षता समजाव्या, नंतर मनानीच कल्पून नैवेद्य धूप दीप दाखवावा व प्रदक्षिणापूर्वक नमस्कार घालावा. नंतर त्याला जी भोजनाकरिता बाजरीची भाकरी मिळे तीच त्याच्या पुढे ठेवावी व डोळे मिटून म्हणावे "देवा ही भाकरी ठेवली आहे, तू अर्धी खा व अर्धी मला ठेव. डोळे उघडून पाही तो भाकरी जशीच्या तशीच असे असे दोनतीनवेळा करावे. नंतर 'देवा माझ्यावर कां रागावलास ? भाकर खात नाहींस ? तुला माझ्या हातची आवडत नाहीं का ? बरे तर." असें म्हणून ती भाकर जंगलात फेकून देई.

भगवान भाकरी खात नाहीं तर मी कसा खाऊ ? मी पण उपाशीच राहीन. असे कित्येक दिवस अन्नपाण्याशिवाय गेले. त्याची शक्ती क्षीण झाली,

वजन घटले व चालताना पाय लटपटू लागले. तरी त्याची पर्वा न करता आपला नित्यक्रम तसाच चालू ठेवला. 'ठाकूरजी भाकर खात नाहीं ! उपाशी रहातो ! काय करू असे म्हणत सारख्या अश्रूच्या धारा लागत असत. चित्त चिंतन करू लागले की अदृश्य वातावरणात जी चैतन्यशक्ती आहे. चित्त चैतन्य न की तो भगवान समोर तेजोमय सगुणरुपात भक्तांपुढे प्रकट होतो. अचिंत्य रंजन दिव्यमूर्ति भक्त नेत्राला संतोष देण्याकरिता सगुणरूपाने प्रकट झाली. आणि धन्नाजीची भाकर खाऊ लागली. प्रेमभाव नंदयशोदेला सुखविणारी सावळी सांब मूर्ति भक्तासमोर येऊन, रूचीने व प्रेमभावाने अर्धी भाकर खाल्ली. तोच धन्ना उठला व प्रभूचा हात पकडून म्हणाला 'प्रभूजी ! इतके दिवस तू कोठे होतास आलास कां नाहीं. मी भुकेने तळमळत आहे हे तुला माहित नाहीं कां ! आणि आज तू आलास मला अर्धी न ठेवता एकटाच सगळी भाकर खातोस ? मला जरासुद्धा देणार नाहींस काय ? मी असाच भूकेने मरू ? मन, चित्त, प्राण भगवंताचे ठायी लीन झाले, त्याच्या मनांत चित्तांत, प्राणांत, नसानसांत भगवंत खेळू लागले ! सरळ प्रेमभावाच्या या बालकाच्या बोलण्याने भगवंत स्तब्ध झाले व उरलेली अर्धी भाकर त्याला दिली.

तो भगवंताचा भाकरीचा प्रसाद खाल्ल्यावर त्याचे अंतचक्षू प्रज्ञाचक्षू जागृत झाले. नेत्राच्या प्रत्ययाला हा भगवंत' प्रत्यक्ष आला आणि सर्वांगाने प्रभूप्रेमात डोलू लागला. त्याला ह्या प्रेमभावाचा वियोग पळभरसुद्धा सहन होईना. भगवान्‌सुद्धा प्रेमरज्जूने बांधल्यामुळे त्याच्यापासून दूर जाईना. त्याच्या पाठीपुढे सारखा संगत करू लागला.

**यो मां पश्यति सर्वत्र सर्वंच मयी पश्यति ।**
**तस्याहं न प्रणश्यमि स च मे न प्रणश्यति ।।**

धन्नाजी आता मोठा झाला होता. त्याला आईने गाई धुण्याचे व त्यांची निगा राखण्याचे काम दिले होते. गाई तरी एक दोन कां ! कितीतरी गाईंचा कळपच. एके दिवशी भगवंत म्हणाले, अरे धन्ना ! तुला फार श्रम होतात रे ! भाई ! तू एकटाच इतक्या गाई कशा धुणार ? तुला मी मदत करतो, नाही, नाही मी स्वतःच ते काम करतो, अशा तऱ्हेने भगवंत आपल्या भक्ताची सेवा करू लागले. भगवंताचे सानिध्य असल्यामुळे धन्ना अचिंत्य आनंद व लडिवाळपणे प्रेमसुख उपभोगित होता, तेणेकरून प्रसन्नतेचा, अमृताचा नकळत वर्षाव जगावर होत होता. जीवांच्या निर्जिव भावनांना सजीव करीत होता. ज्याने जगत निर्माण केले त्याला निर्माण करणाऱ्या या भक्तांचे कोडकौतुक कोठवर करावे ? असे कौतुकमय प्रसंग पहाणारांचे नेत्र खरोखर धन्य होत.

माणूस स्वतःला दुःखी समजतो पण वस्तुतः याला तर दुःखाची ओळखही नाही अर्थात सुखाचीही ओळख नाही. दुःखाची खरी ओळख असती तर सुख काय हेही समजले असते. पण तसें कुठले व्हावयाला. अहंकारी माणसाला पोथ्या, पुराणे वाचून व देव पूजेची कवाईत करून 'देव' काय आहे हे कसे कळणार ? त्या ब्राम्हणांनी असून एक काळा दगड धन्नाजीला दिला पण 'जळी स्थळी भरला देव' याचा अनुभव कुठे आहे ? आपली प्रियत्वाच्या दुःखाने अवस्था पेटून राहिली पाहिजे. बुद्धीला गवसणी घालून कामाची नाही, श्रीहरीला गवसणी घातली पाहिजे. 'प्रभू मला काही समजत नाही. दामाजीच्चीं कामे केलीस जनाबाईसाठी शेणी वेचल्यास. प्रभु तुझे ते गोजिरे साजिरे रूप दाखीव रे. माझी काय चूक झाली, मला समजत नाहीं. तू जाणणारा आहेस. मुलाला गप्प बस म्हणून ते कसें उगी राहणार ? प्रियतेचा आधार आहे ना ? प्रियदशा बोलल्याशिवाय रहाणार कशी ? जीव सतत मिळून येतो. आई दिसली कीं मुलानें हात पसरून 'आई मला घे, आई मला घे' असें म्हणून आईकडे धाव घेतलीच पाहिजे. सुखाच्या कल्लोळाचे हे रूप आहे. मूल आईला घे म्हणते व आई उचलत नाहीं. मग त्या बाळाची काय अवस्था ? प्रभु, केवढे त्या बाळाला संकट ? तसें श्रीहरि लवकर या व मला उचलून पोटाशी धरा. निकट आहे खरा, पण दिसत नाहीं रे अशा या विरहाग्नीने संत दुःखी असतात, सतत रडतात. अशा तऱ्हेचा सुखसोहळा त्या ब्राम्हणाला कुठचा ?

फिरत फिरत तो ब्राम्हण धन्नाकडे आला. आणि विचारू लागला की 'क्यों ! भगवानकी पूजा करते हो या नहीं ? धन्नाने ब्राम्हणाच्या चरणांना स्पर्श करून हंसत प्रेमपूर्वक आपुलकीच्या भावनेने म्हणाला, "महाराज ! आपण खरोखरीच मला चांगला देव दिलात. पहिले काहीं दिवस तो माझी पूजा व भाकरी स्विकारिना! कित्येक दिवस तो उपाशीच राहिला व मलासुद्धा उपाशीच ठेवले. शेवटी एके दिवशी एकदांची स्वारी आली आणि भाकर खाऊ लागली. अर्धी भाकर गट्ट केल्यावर पुढे खाणार तोंच मी त्याचा हात पकडला, व अर्धी भाकरी मागून घेतली. आता तो माझ्या बरोबर सतत असतो व बारीक सारीक कामे तोच करतो. गाई धुतो, दूध काढतो, पळभरसुद्धा मला सोडत नाहीं. माझा तर तो प्राणच आहे.

भगवंताच्या निर्मल हास्यातून त्याच्या चित्तात प्रेमाविर्भाव प्रकट झाला. प्रेमानंदाची माधुरी तो चाखू लागला. दिव्य आनंद व शांती याचा उदय त्याच्या चित्तात झाला. त्याचे मुखकमल तेजस्वी व हंसरे दिसू लागले. त्या ब्राम्हणाला हे पाहून व ऐकून आश्चर्याची धडकीच बसली. तो म्हणाला 'बेटा धन्ना ! कहाँ है वह तुम्हारा भगवान ? धन्ना आश्चर्यमूढ होऊन म्हणाला "काय !

आपणांस दिसत नाहीं ! हा काय माझ्या जवळच माझा हात धरून उभा आहे." ब्राम्हणाला दर्शन न झाल्यामुळे परत म्हणाला "कहाँ धन्ना ? मुझे तो नहीं दिखता." धन्ना भगवंताला विनवू लागला 'हे प्रभो ! या ब्राम्हणांनीच मला तुझी मूर्ति दिली होती व पूजापाठ शिकवला ते माझे गुरुजी आहेत. देवा त्यांना दर्शन तू का देत नाहीस ? बिचारा धन्ना प्रभूच्या मुखकमलाकडे विनयशील मुद्रेने पहात राहिला.

"धन्ना ! प्रभू म्हणाले, "तुझी ही सेवा आजची नाहीं. जन्मजन्मांतरिच्या तुझ्या सेवेला व तुझ्या शुद्ध भक्तिभावाला मी तुझा ऋणी होऊन, तुला दर्शन दिले. परंतु आता हा ब्राम्हण तुझा गुरु झाल्यामुळे त्याला पुष्कळ पुण्याई प्राप्त झाली असल्यामुळे त्याला दर्शन देऊ शकेन. तू त्याचा हात पकड म्हणजे तुझ्या स्पर्शामुळे त्याला दिव्य दृष्टी प्राप्त होईल व नंतर तो मला बघू शकेल. धन्नाने त्याप्रमाणे केल्यावर त्या ब्राम्हणालासुद्धा प्रभुदर्शन घडले.

धन्नाची बाललीला समाप्त झाली. भगवंताने परमार्थाची परंपरा राखण्याकरिता गुरुमंत्र दिक्षा घेण्यास विनविले व ते गुप्त झाले. नंतर काशीक्षेत्री जाऊन श्रेष्ठ आचार्य श्री. श्रीरामानंद यांच्याकडून गुरु-मंत्र दिक्षा घेतली. त्यानंतर त्याला तत्त्वज्ञान प्राप्त झाले व हृदयामध्ये त्याला श्रीची मूर्ति दिसू लागली.

एके दिवशी धन्नाला शेतात गहू पेरण्याकरिता त्याच्या वडीलांनी सांगितले. तो गहू पेरण्याकरिता शेताकडे जात असता रस्त्यात त्याला काही साधुसंत भेटले. ते भुकेने व्याकूळ झालेले, धन्नाकडे भिक्षा मागू लागले. धन्नाला जिकडे तिकडे श्यामसुंदरच दिसू लागले. सन्तरूपात सुद्धा त्याला तेच दिसू लागले. त्यांनी सर्वच्या सर्व गहू त्यांना दिले.

सर्व गहू दिल्यावर आईबापाच्या भितीने तो तसाच शेताकडे गेला व मुखाने 'गुरुमंत्र' म्हणत शेत नांगरू लागला. भक्ताची लाज राखण्याकरिता व महिमा वाढविण्याकरिता आपल्या अघटीत–घटना परीयसी मायेने सर्व शेत पिकून पिवळे जर्द केले. हे पाहून लोकांना आनंद झाला. पण धन्ना मात्र विचार करू लागला की मी शेतात एकही गव्हाचा दाणा न पेरता हे अघटीत कसें घडले ! ही प्रभूचीच माया आहे हे त्याला समजले. त्यांनी पुन्हा पुन्हा प्रेमार्द होऊन भक्तीभावाने प्रणाम केला. प्रभो ! तुझी लीला अगाध आहे नाथाजी महाराज म्हणतात.

**घर आये हरिदास तिन्हें गोधूम खवाये ।**
**तात मात कर भोत खेत लंगूर बवाये ॥**

आसपास कृषिकार खेतकी करत बडाई ।
भक्त भेजकी रीति प्रगट परतीतिजु पाई ॥
अचरत मानव जगत में कहुं निपज्यो कहु वै वायो ।
धन्य धनाके भजनको विनहि बीज अंकुर भयो ॥

भारत ही वैष्णवांची प्रिय भूमि आहे. देवाची लाडकी भारत-भू आहे. धर्माकरिता ज्यांचे रक्त सळसळते असे दिव्य आत्मे जगाला दिले आहेत, देत आहेत व देणार आहे.

● ● ●

# साईभक्त वसंत देसाईंचे

## दु:खद निधन

मुंबापुरीतील संगीताचे सुविख्यात सूरसम्राट, विख्यात संगीत-दिग्दर्शक व निस्सीम साईभक्त श्री. वसंतराव कृष्णाजी देसाई यांचे सोमवारी २२ डिसेंबरला अपघाती निधन झाले. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी ह्या संस्थेशी वसंतरावांचा घनिष्ट संबंध होता. १९६८ साली मुंबापुरीत साजऱ्या झालेल्या श्रीबावांच्या ५० व्या पुण्यतिथीमहोत्सव प्रसंगी मनोरंजन, संगीतसूरांची बाजू उत्स्फूर्त-रितीने त्यांनी सांभाळली होती. त्यांच्या या आकस्मिक साईचरणी विलीनामुळे एक बहुमोल हिरा हरपला आहे.

कवितामृताचा वर्षाव करणारा
व्रज भाषेतील प्रेमोन्मत्त कवि

# घनानंद

● विनायक पाठक

**शृंगाराला आध्यात्माची बैठक :**

'रुचि के राजा' व 'व्रजभाषाप्रवीण' असा लौकिक असणारे घनानंद म्हणजे कवितामृतवर्षा करून रसिकांना चिन्मयानंदाची अनुभूति देणारा जणु ब्रम्हानंदच ! हिंदी साहित्याच्या रीतिकाळातील बऱ्याच प्रातिनिधिक कवींनी लक्षण ग्रंथ, नायक-नायिका भेद, रीति ग्रंथ वगैरे प्रकारचे साहित्य सृजन केले तर काहींनी भक्ति, नीति विषयक संबंधीची गीते व शृंगाररसांनी ओतप्रोत भरलेली फुटकळ रचनाही केली. शृंगार रसाने परिपूर्ण अशी कविता लिहिण्यात घनानंद आघाडीचे कवि असले तरी त्यांच्या शृंगाराला आध्यात्माची बैठक असलेली आढळते. त्यांचा सकृद्दर्शनी दिसणारा शृंगार आध्यात्मिक चिंतनाकडे वळतो. उच्च आणि उदात्त प्रेमाची उत्कट अभिव्यक्ति म्हणजे घनानंदांची कविता असे म्हणता येईल.

**कर्तृत्वाचा कळस :**

घनानंदांचा जन्म संवत् १७१५ ला दिल्लीतील एका भटनागर कायस्थ कुटुंबात झाला. तथापि आचार्य रामचंद्र शुक्लांच्या हिशेबी मात्र, यांचा जन्म संवत् १७४६ चा आहे. त्यावेळी भारतात यावनी सत्तेचे प्राबल्य होते. घनानंदांनीही परंपरेने चालत आलेला आपला नोकरीपेशा चालू ठेवला व त्यावेळी दिल्लीच्या तख्तावर असणाऱ्या मुहम्मदशाहच्या दरबारात आपल्या असीम कर्तृत्वाने बुद्धिमत्तेने व प्रामाणिकपणाने हळूहळू ते 'प्रायव्हेट सेक्रेटरी' च्या पदापर्यंत पोहोचले.

**इश्क इश्क श्रीकृष्णावरली :**

तसे पाहिले तर घनानंदांना लहानपणापासूनच श्रीकृष्णाबद्दल अपार प्रेम वाटायचे – आकर्षण वाटायचे. त्यावेळी सर्वत्र रामलीला प्रमाणेच श्रीकृष्णाच्या रासक्रीडांचे प्रयोग होत. रासक्रीडा करणारी नाटकमंडळी दिल्लीत आली म्हणजे, त्यांच्या खर्चाची व्यवस्था घनानंद मोठ्या श्रद्धेने व आपुलकीने करीत असत. या रासक्रीडा पाहण्यातूनच त्यांना हिंदी भाषेतील गीतांची व संगीताची गोडी लागली व पुढे पुढे तर ते स्वतःच रासक्रीडातील निवडक प्रसंगांना

प्रासादिक गीतांचा साज चढवू लागले, व अशा तऱ्हेने श्रीकृष्णाच्या रासलीला हीच घनानंदांच्या काव्याची प्रेरणा झाली. स्वतः गाणी रचायची व त्यांना निरनिराळ्या चाली देऊन ती गाणी स्वरबद्ध करायची हा त्यांचा छंद झाला. साहित्य आणि संगीत या दोहोंचा समसमा संयोग त्यांचे ठायी होता.

**उपलब्ध ना ती फारसी :**

घनानंदांचे व्रज भाषेवर जसे प्रभुत्व होते तसेच फारसी भाषेवरही त्यांचे प्रभुत्व होते. त्यावेळी प्रसिद्ध असलेले फारसी भाषातज्ज्ञ अबुलफजल यांचे घनानंदांनी शिष्यत्व पत्करले होते. सत्संग व जिज्ञासा यातून त्यांनी फारसी भाषेतही काहीं कविता – गीते लिहिली असे म्हणतात. पण अद्यापपर्यंत त्यांची फारसी कविता वा गीते फारशी उपलब्ध नाहींत.

**सुजान होती जान तयाची :**

घनानंद सुजान नामक वेश्येवर अनुरक्त होते. तिच्याशिवाय घनानंदांना चैन पडत नसे. ती कोमलांगी वेश्या म्हणजे त्यांची प्रतिभाच जणू। घनानंदांच्या संगीताविषयी कुणीतरी बादशहा जवळ प्रशंसा केली व ती ऐकून मुहम्मद-शाहने त्यांना पाचारण करून "आम्हांलाही तुमची रसभरी रचना ऐकवा" असा आग्रह केला. पण कलावंत म्हणजे नेहमी लहरी. उगीच आढेवेढे घ्यायचे व गायचे टाळायचे ! शेवटी कुणीतरी बादशहाला एक गुपित सांगितले की, सुजान वेश्या त्यांना गाणे म्हणायला लाविल तर ते गाणे म्हणतील. लगेच बादशहाचे फर्मान निघाले. सुजानवेश्येला दरबारात आणण्यात आले. व तिने घनानंदांना आग्रह करताच घनानंद गाऊ लागले पण त्यातही त्यांनी आपला लहरीपणा दाखविलाच ! गाताना सुजानकडे केले तोंड व बादशहाकडे केली पाठ गाणे फर्मास झाले. सर्व श्रोते तल्लीन झाले. स्वरमाधुर्याची गुंगी दरबाराला आली. बादशाहाही खुश झाला पण आपल्याकडे पाठ करून गायल्याने शहेन-शहाच्या प्रतिष्ठेला धक्का बसला व तो अपमानाने चिडला. बादशहाने घनानंदांवर हद्दपारीचा हुकम बजावला. वरिष्ठांचा कोप नाशास कारण !

**सुजान ने दिलेली सु–जाण**

जेव्हा घनानंद बाहेर पडले तेव्हा त्यांनी सुजानवेश्येलाही आपल्याबरोबर येण्याचा आग्रह केला. पण कसचे नि काय ? बोलून चालून वेश्याच ती ! तिने घनानंदांबरोबर जाण्याचे साफ नाकारले. जिच्यावर आपण प्राणापलिकडे प्रेम केले. ती आपल्याला शेवटपर्यंत साथ देईल असा त्यांचा समज होता. भ्रमाचा भोपळा फुटला. आपली जान असलेली सुजान आपल्याला शेवटपर्यंत साथ द्यायला नाकबूल आहे हे पाहून त्यांना क्षणभर वाईट वाटले व क्षणैक दुःखाचे उपरतीत परिवर्तन झाले. आसक्तीचे विरक्तीत रूपांतर झाले." विकल्प

सारे मनिचे फिटले." व ते वृंदावनाला गेले. संसाराचे सर्व पाश तोडून त्यांनी निंबार्क संप्रदायाची दीक्षा घेतली. "घनानंद तो वैष्णव झाला। देहभान विसरला" अशी त्यांची अवस्था झाली.

श्रीकृष्णभक्तीच्या तल्लिनावस्थेतच त्यांनी आपला "सुजान–सागर" हा ग्रंथ लिहिला. सुजान–सागर म्हणजे रसिकांच्या काळजाचा ठाव घेऊन प्रेमामृताचा वर्षाव करणारा असा ग्रंथ आहे. याच "सुजान–सागर" ग्रंथातील निवडक ११८ दोहे व कवित्त भारतेंदु हरिश्चंद्र यांनी 'सुजान-शतक' म्हणून संपादित केले. त्यांनी लिहिलेल्या या ग्रंथाच्या प्रस्तावनेत घनानंदांना संगीताचे उत्तम ज्ञान असून त्यांच्या प्रतिभेतून कवित्वशक्तीची शान अभिव्यक्त होते. असा गौरवपर उल्लेख आहे.

**गोकुळ वृंदावन-पृथ्वीवरील नंदनवन :**

गोकुळ वृंदावन म्हणजे या पृथ्वीतलावरील साक्षात् स्वर्ग आहे. एक रम्य दैवी नंदनवन आहे ही भावना त्यांच्या खालील कवितात अभिव्यक्त झालेली आढळते:–

**"गुरुनि बतायो, राधा मोहन हू गायो सदा**
**सुखद सुहायो वृंदावन गाढे गहिरे ।**
**अद्‌भुत अभूत महिमंडन, परें ते परे**
**जीवन को लाहु हा हा क्यों न ताहि लहि रे ॥**
**आनंद को घन छायो रहत निरंतर ही,**
**सरस, सुदेय सो, पपीहापन बहिरे ।**
**जमुना के तीर केलि कोलाहल भीर ऐसी ।**
**पावन पुलिन पें पतित परि रहि रे ॥"**

**घनानंदांचा भाव-सागर :**

घनानंदांचे भावविश्व अपार होते. सुजान-सागर, कोकसार, कृपाकांड, बिरहलीला, रस कोलिवल्ली, वगैरे ग्रंथ म्हणजे घनानंदांचा विस्तृत भावसागरच नव्हे अमृताचा गोडवा असलेला सार सागरच! या व्यतिरिक्त त्यांनी लिहिलेले चारशेच्या आसपास फुटकळ कवित्त, सवैये ही उपलब्ध आहेत.

"बिरह-लीला" हा व्रज भाषेतील फारसी छंदात लिहिलेला काव्य ग्रंथ आहे. परमात्मा व जीवात्मा या प्रतिकांतून प्रेमिकांची झालेल्या विरहावस्थेची सूक्ष्म, अतिसूक्ष्म बारकाव्यासह केलेली अभिव्यक्ति आहे. विरहावस्थेचा स्वानुभव असल्यामुळे ही बिरह-लीला वाचकांच्या काळजालाच हात घालणारी आहे.

**भावुक कविता हरते चित्ता :**

घनानंदांबद्दल रेवानरेश श्री. रघुराज सिंहजु देव यांनी आपल्या भक्तमाळ

(राम रसिकावली) या ग्रंथात निस्सीम प्रेमी भक्त म्हटले आहे. त्यांच्या ग्रंथातील "घन आनंद के विपुल कविता। अबलौ हरत कविन के चित्ता॥" हा उल्लेख मोठा अर्थपूर्ण आहे. घनानंदांची भावुक कविता वाचून वाचणाऱ्याच्या डोळ्यांतून सम्मिश्र भावनांचे अश्रु न ओघळले तरच आश्चर्य !

मनात उचंबळून येणाऱ्या उत्स्फूर्त भावनांना हव्या त्या नेमक्या व शेलक्या शब्दांनी अभिव्यक्त करण्याचे भाषा सामर्थ्य, रचनेतील नादमाधुर्य, प्रयोग वैचित्र्य लाक्षणिक मूर्तिमत्ता, आध्यात्मिक विचारांची सखोल बैठक, लौकिक प्रेमाकडून भगवत्प्रेमापर्यंत पोहोचताना प्राप्त झालेली गाढ अनुभूति, अंतर्वृत्ति निरुपणाची प्रवृत्ति या व अशा अनेक लोभस गुणांनी घनानंदांची कविता लोकप्रिय झाली. धनानंदांसारखा वियोग शृंगाराचे चयन करणारा मुक्त कवि विरळाच !

घनानंदांचे यथार्थ व मार्मिक वर्णन करणाऱ्या खालील ओळी किती अर्थ पूर्ण आहेत ते पहा :–

**"नेही महा, व्रजभाषा प्रवीन औ सुंदरताहु के भेद को जानै । योग वियोग की रीति में कोविद, भावना भेद स्वरूप को ठाने ॥ चाह के रंग में भीज्यो हियो, बिछुरे मिले प्रीतम सांति न माने । भाषा प्रवीन, सुछंद, सदा रहै सी घन जु के कवित्त बखानैं ॥"**

**प्रेमाकडून परमेश्वराकडे :**

प्रेमिकांच्या विरहवेदनेची अतीव पीडा हीच घनानंदांच्या काव्याची मूळ प्रेरणा आहे. "प्रेम की पीर" चा मागोवा घेत घेत प्रेमातून परमेश्वराचा साक्षात्कार झालेला हा कवि आहे. त्यांच्या विप्रलंभ शृंगारातूनच मधुरा भक्तीचा उद्भव झालेला आढळतो. लौकिक प्रेमाकडून भगवतप्रेमाकडे वळलेल्या घनानंदांची कविता सर्वार्थाने अलौकिक न ठरती तरच आश्चर्य होते! ओघवती व्रज भाषेत लिहिलेल्या घनानंदांच्या कवितेत अनुप्रास, वक्रोक्ति, विरोधाभास, अतिशयोक्ती, उत्प्रेक्षा आदि अत्युत्तम अलंकारांचे ऐश्वर्य आढळते.

**आध्यात्माची नादमधुर व्यंजना :**

घनानंदांची श्रीकृष्णावरील अतीव श्रद्धा, जीवनाचा सारसर्वस्व, आध्यात्मिक तत्वज्ञान यांची नादमधुर व्यंजना किती अर्थगर्भ आहे ते पहा :–

**"ए रे बीर पौन ! तेरो सबै ओर गौन वारि**
**तों सों और कौन मनै ढरकौंही बानि दै**
**जगत के प्रान, ओछेबडे को समान घन**
**आनंदनिधान सुखदान दुखियानि दै ॥**
**जान उजियारे, गुन भारे अति मोहि प्यारे**
**अब है अमोही बैठे पीठि पहिचानि दै**

बिरहबिथा की मूरि आँखिन में राखौ पूरि
धूरि तिन्ह पायँन की हा ! हा ! नैकु आनि दै ॥"

**श्रीकृष्ण : आनंद – निधान**

श्रीकृष्ण म्हणजे 'जगत के प्रान' त्याच्या शिवाय सर्वकाही गौण आहे. लहान-मोठे श्रीमंत-गरीव हा भाव त्याचे ठिकाणी नाही. ते श्रीकृष्णरूप म्हणजे आनंदनिधान व सुखदान करणारे चिन्मयरूप आहे. ते रूप या डोळ्यात सदोदित राहो हीच घनानंदांची इच्छा होती.

**संगीताने ये मधुरता :**

घनानंदांना संगीताचे चांगले ज्ञान असल्यामुळे त्यांची अनेक मधुर पदे सारंग, मालकंस, कानडा, काफी, रामकली, बागेश्री, जयजयवंती वगैरे राग-रागिण्यांतून गायिली गेलीत, व खुप लोकप्रियही झालीत.

**दोन प्रसिद्ध सवैये :**

घनानंदांचे खाली उधृत केलेले दोन सवैये अनेकांकडून नेहमी ऐकायला मिळतात :

"परकाज देह को धारे फिरौ
परजन्य जथारथ ह्वै दरसौ ।
निधि नीर सुधा के समान करौ
सबही विधि सुंदरता सरसौ ॥
घन आनंद जीवनदायक हौ,
कबौ मेरियौ हिये परसौ ।
कबहूँ वा बिसासी सुजान के आँगन
मो अँसुवान को लै बरसौ ॥"

यात परोपकारी वृत्तीचे प्रत्येकाच्या जीवनात असणारे महत्व सांगितले आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही वृत्ति परोपकारीशिवाय अंगी बाणणार नाहीं हाच यातील मतितार्थ !

दुसऱ्या एका सवैयात ते प्रेममार्गाची विचित्रता वर्णन करताना म्हणतात:—

"अति सूधो सनेह को मारग है,
जहु नैकु सयानपन बांक नहीं ।
तँह सांचे चलै तजि आपन पौ,
झिजकै कपटी जो निसांक नहीं ॥
घन आनंद प्यारे सुजान सुनौ,
इत एक ते दूसरों आंक नहीं
तुम कौनसी पाटी पढे हौ, लला,
मन लेहु पै देहु छटाँक नहीं ॥"

मण आणि छटाक या शब्दावर श्लेष साधून भोपळा घेऊन आवळाही न देणाऱ्या आपल्या प्रियकरासंबंधी तिने लाडीक तक्रार केली आहे की माझं मन घेतो पण आपल्या मनाचा एक कोपराही (छोट्यात छोटा भाग–छटाक) मला देत नाहीस ही भलती कंजुशी हे लला, (म्हणजे प्रियकरा) तूं कोणत्या शाळेत शिकला बरे ?

**सदेह झाला स्वर्गस्थ कवि**

अशा या व्युत्पन्न कविचा मृत्यु संबंधींची हकीकत मोठी करुण व रोमहर्षक आहे. संवत् १७९६ मध्ये नादिरशाहने जेव्हां मथुरा लुटली तेव्हां घनानंद एका झाडाखाली त्या मनमोहन मुरलीधराच्या चिंतनामध्ये मग्न होते. स्वतःचा प्राण वाचविण्यासाठी कुणातरी त्या लुटारूंना सांगितले की बादशहाचा मीर मुंशी घनानंद त्या तिकडे एका झाडाखाली बसला आहे. त्याला लुटा म्हणजे तुम्हांला खूप धन मिळेल झाल ! माकडाच्या हातात कोलीत मिळाले. त्या सर्व लुटारूंनी घनानंदांना घेरले, व "जर, जर, जर लाओ।" म्हणजे धन धन जे धन तुझ्याकडे आहे ते आम्हांला दे. घनानंदाची प्रतिभा जागी झाली. त्यांनी जर जर जर शब्दाला उलटा करून (रज, रज, रज) वृंदावनची रज म्हणजे, माती त्या लुटारूंवर फेकली.

यवन लुटारूंना वाटले हा माणूस स्वतःचा जीव वाचविण्यासाठी हे समाधीच व रज, रजचे ढोंग करतोय. त्यामुळे चिडून त्यांनी घनानंदांवर तलवारीचे वार करायला सुरूवात केली. पण असं म्हणतात- त्या खड्‌गघाताचा घनानंदांवर काहीच परिणाम झाला नाहीं. उलट ते श्रीकृष्णाचा मोठमोठ्याने धावा करू लागले.

**"मोको भूरि भार है देहू**
**यत्न किये छूटत नहि केहू**
**कौन हेतु राखत संसारा**
**क्यों न बुलावैं नंदकुमारा ?"**

बाबांनो ! हा देह म्हणजे भुईस भार झाला आहे. मारा वार त्याच्यावर, न् सुटू द्या मला या देहबंधनांतून एकदाचा ! चिडून त्या सैतानांनी एकामागून एक तलवारीचे वार मारून डोके व धड वेगळे केले आणि चमत्कार काय झाला ? ते धडावेगळे घनानंदांचे डोके जमीनीवर "कृष्ण कृष्ण श्रीकृष्ण मुरारी" म्हणून नाचू लागले. व शिरच्छेद झाल्यावर रक्ताचा एकही बिंदू जमीनीवर आढळला नाहीं. लुटारू हा चमत्कार आ वासून पाहू लागले. तोच असे म्हणतात एक विमान खाली उतरले व घनानंद संत तुकारामांसारखे सदेह वैकुंठवासी झाले. कवि घनानंद अंतर्धान झाले तरी त्यांची कविता आजमितीस लोक मोठ्या प्रेमाने वाचतात. कवि मर्त्य आहे. काव्य अमर आहे. हाच यातील इत्यर्थ !

● ● ●

# श्रीसाईबाबा एक आगळा अनुभव

● श्री अनंत पै काणे, (पणजी)

श्रीसाईबाबांविषयी खूपसे ऐकले होते, वाचलेही होते, 'श्रीसाईसच्चरित' ग्रंथाचे एक सप्ताह-पारायण सुद्धा केले होते. पण श्रीक्षेत्र शिरडीला जाण्याचे मनात असूनहि तसा योग येत नव्हता. सप्टेंबर १९७३ मध्ये मी सपत्नीक मुंबईला गेलो होतो. त्यावेळी पत्नीने आग्रहच धरिला की इतक्या नजीक आपण आलो आहोत, शिरडीला जाऊयाच. मी होकार दिला. पण एक अडचण निघाली ती कशी सोडवायची तें समजेना. कोणीतरी एकदा सांगितले होते की सप्ताह-पारायणाच्या वेळी जी रक्कम दक्षिणेदाखल काढून ठेवतात तीच रक्कम (म्हणजे त्याच नोटा किंवा तीच नाणी) शिरडीला पोचती करावयास हवीत. आम्ही तर ती रक्कम गोव्याला देवाच्या देव्हाऱ्यात ठेऊन आलेलो. ती दक्षिणेची रक्कम बरोबर न घेता शिरडीला जाणे प्रशस्त वाटेना. तेव्हा गोव्यातल्या एका नातलगाला फोन करून ती रक्कम रजिष्टर पत्राने मुंबईस पाठविण्याची विनंति केली. इकडे आम्ही बॉम्बे सेंट्रलवरून शिरडीला निघणाऱ्या बसची तिकिटे रिझर्व केली व दक्षिणेच्या रक्कमेची वाट पाहात राहिलो. निघावयाचा दिवस उद्यावर आला पण रजिष्टर पत्र गोव्याहून येईना. तेव्हा रक्कम पुढेमागे केव्हाही नेऊ, तिकीटे रिझर्व केली आहेतच तर उद्या जाऊयाच. असा पत्नीने आग्रह धरिला. सामानाची बांधाबांध केली. पण रात्री मला एकदम अस्वस्थ वाटू लागले. डॉक्टर म्हणाले तुमचे ब्लड प्रेशर वाढलेले आहे. तुम्हाला लांबचा प्रवास झेपावयाचा नाहीं. झाले. तिकिटे कॅन्सल केली व बेत रद्द केला. आलेला योग अशा रीतीने हुकलेला पाहून पत्नीला फारच वाईट वाटले.

पण दुसऱ्या दिवशी सकाळी गोव्याहून दक्षिणेची रक्कम रजिष्टर पत्राने आली व आता प्रकृतीला जरा बरे वाटताच शिरडीला जाऊन यावयाचे असे ठरविले. बसची तिकीटे लगेच मिळणे शक्य नसल्याने, प्रवास रेल्वेने करावा असे ठरले व त्याप्रमाणे चार-पाच दिवसानी आक्टोबरच्या १५ तारखेस, माझे एक नातेवाईक जे आधी शिरडीला जाऊन आले होते त्यांच्या सोबतीने आम्ही काशी-एक्सप्रेसने निघून दुपारी २॥ वाजण्याच्या सुमारास शिरडीला पोचलो. दुरूनच समाधि मंदिराचे शिखर दृष्टिपथांत येताच मनाला अवर्णनीय आनंद झाला. धूळभेट घेतली व जेवण करून दुसऱ्या दिवशीची परतीच्या बसची तिकीटे रिझर्व केली. (कारण सोबतीला आलेल्या नातेवाईकांची रजा दोनच दिवसांची होती) नंतर सावकाशपणे द्वारकामाई, चावडी, लेंडीबाग वगैरे श्री

साईबाबांनी आपल्या पदस्पर्शाने पुनीत केलेल्या वास्तु व जागा पाहिल्या. दक्षिणेची रक्कम भांडारात जमा केली व श्रीबाबांच्या समाधिस्थानावर फुलांचे हार वाहिले. संध्यासमयींच्या व रात्रीच्या आरतीस हजर राहुन रात्री मुक्काम गुरुस्थानाजवळच्या एका खोलीत केला. दुसरे दिवशी सकाळी काकड आरती-नंतर सगळ्यांनी अभिषेक केला व साकोरीला जाऊन आलो व दुपारच्या आरतीला हजर राहून २ वाजताच्या बसने मुंबईस परत आलो. दक्षिणेची रक्कम जोपर्यंत हातात आली नव्हती तोपर्यंत कोण अडचणी. पण रक्कम हातात आली न आली शिरडी-वारीची तयारी एका दिवसात झाली.

शिरडीला जाऊन आलो पण मनाचे पूर्ण समाधान झाले नाहीं. गेल्यासारखे २।३ दिवस तरी राहायला हवे होते असे मनातल्या मनात वाटत होते. पण निरुपाय होता. नातेवाईकांना रजा वाढविणे शक्य नसल्याने मुंबईला परतणे भाग होते.

मुंबईला पोचल्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीची गोष्ट. नेहमीप्रमाणे मी सकाळी चौपाटीवर फिरून घरी परत येताना ह्युजेस रोडवर 'अजिक्य हॉस्पीटल' जवळ फुटपाथवर सफेत वेष परिधान केलेला एक फकीरबाबा मला दिसला. फकीरबाबांचे वय अंदाजे ५५ ते ६० असावे. हातात मोरपिसांची चवरी. व्यक्तिमत्व भव्य व आदर उत्पन्न करणारे. मी खिशातून एक नाणे काढन फकीरबाबांच्या हाती ठेविले. फकीरबाबांनी प्रश्न केला. 'हाजी मलंग जानता है ?" 'नाहीं, मी उत्तरलो. 'शिरडी साईबाबा ?' फकीरबाबांनी पुन्हा प्रश्न केला. मी म्हटले 'जरूर जानता हुं। कुछ दिन पहले मैं वहाँ जाकर आया हूं."

'वहां जानेपर भी मुझे नहीं पहचाना ?' फकीरबाबा पुढे म्हणाले. मी चेहरा न्याहाळून पाहिला. तोंडावळा श्रीसाईबाबांचा, दाढी-मिशा त्यांच्याच पद्धतिच्या, जराशा पिकलेल्या, तोंडावर तेज मी जरा जवळ गेलो.

'अभी तो जरूर पहचाना होगा.' 'शिरडीमें नीमवृक्ष है ना, वहांहि हमारी वसती है. तुम्हारे खूप किस्मतियोंसे यहां बंबई में रास्तेपर हमारी मुलाकात होती है ? फकीरबाबांनी प्रश्नोत्तरी पुढे चालू ठेवली.

'आप कहां से ,आये ?' 'गोवासे' मी.

'बंबई में क्या काम ?'

'मेरा बेटा यहां रहता है, वह मॅकनिकल इंजिनियर है। बहोत दिनोंसे वह मुझे बंबई आने के लिने कह रहा था, इसलिये मैं और मेरी बीबी दोनों यहां आये हैं ? मी आदरपूर्वक उत्तर दिले.

फकीरबाबा पुढे म्हणाले, 'जो कुछ मैं तुम्हे कहूं वह तुम तुमारे बेटेको कहोगे ?

'जरूर' मी म्हणालो.

'तो इसी वक्त एक नारियल और एक चादर मुझे पहिले दे दो' फकीरबाबा म्हणाले. मी म्हटले, 'इस वक्त चादर कहां मिलेगी? दुकाने अभीतक बंद है' त्यावर फकीरबाबा पुढे म्हणाले 'कुछ पर्वा नहीं. वचन तो दो और तुमारे खीसेमें जो कुछ हो वह दे दो.' मी पँटच्या खिशात हात घातला. पांच रुपयांची नोट हातात आली ती मी त्यांच्या हातात ठेवली. त्यावर 'साईबाबा आपको खूष करेगा' असे म्हणून फकीरबाबा चालू लागले. मी त्यांच्या मागे मागे जाऊन त्यांना विचारू लागलो, 'आप कुछ कहनेवाले थे ना मेरे बेटे के लिये?' पण फकीरबाबा दिसेनासे झाले. घडलेल्या गोष्टीचा विचार करीत मी घरी परतलो.

सबंध दिवसभर मी मनाशींच म्हणत होतो. मला भेटलेले हे फकीरबाबा कोण असतील? श्रीसाईबाबाच असतील का? त्यांनी मला मुंबईच्या रस्त्यावर भेट देण्यासारखे कोणते पुण्यकृत्य माझ्या हातून घडले होते? माझ्या मुलाला ते काय सांगणार होते. जे शेवटी राहुनच गेले? अशा अनेक विचारांनी मला सबंध दिवसभर अस्वस्थ करून सोडले. काय सांगणार होते ते माझ्या मुलाला? नक्कीच काहीतरी सांगणार होते. कारण हा माझा मुलगा काविळीच्या विकारातून नुकताच उठला असल्याने आमच्याबरोबर शिरडीला येऊ शकला नव्हता. मी जास्तच अस्वस्थ झालो. घडलेली घटना घरातील मंडळींना सांगण्यास मन घेईना. कारण कोणीच तीवर विश्वास ठेवला नसता. शेवटी मी सांगावयाचे ठरविले. पण सांगताना वरील प्रत्यक्षात घडलेली घटना स्वप्नात घडल्याचे मी त्यांना सांगितले. माझ्या तोंडून ऐकलेल्या हकीगतीवर कोणीच अनुकूल वा प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त केली नाहीं. पण प्रत्येकाला वाटले की काहीतरी अनाकलनीय असे घडले आहे. यावर दिवस गेले. आम्ही डिसेंबरच्या सुरवातीस गोव्याला परतलो.

गोव्याला येऊन १०–१२ दिवस झाले असतील. माझे एक मेहुणे जे दरवर्षी १ जानेवारीला शिरडी-वारी न चुकता करतात ते आमच्याकडे आले व आपण २५ डिसेंबरच्या सुमारास शिरडीला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले त्यावर मी म्हणालो, तुम्ही जाताच आहात तर मी एक नारळ व एक चादर देतो ती श्रीबाबांच्या चरणी अर्पण करा. उत्तरादाखल ते म्हणाले मी जरूर नेईन, पण तुम्हीच माझ्याबरोबर शिरडीला का नाही येत? मी अवाक् झालो. शिरडीला जाऊन आल्यास महिना-दीड महिनाच झाला होता. फिरून एवढा लांबचा प्रवास मला झेपेल काय? तरी पण मी म्हटले, तिकीटे मिळतील काय? त्याची काळजी तुम्हाला नको, तुम्ही फक्त हो म्हणा, मी सगळी व्यवस्था करतो. खरोखर त्यांनी तशी व्यवस्था केली व त्यांच्या सोबतीने मी व माझी पत्नी

डिसेंबरच्या ३१ तारखेस दुपारी शिरडीला पोचलो. शिरडीला जाण्याचे नक्की झाल्यावर आम्ही मुंबईस फोन करून मुलाला कळविले. तो पहिल्याने आश्चर्य-चकित झाला पण आम्ही सगळे काही सविस्तर सांगितल्यावर तो आम्हाला पुण्याला येऊन भेटला व आम्ही मिळूनच शिरडीला आलो.

ह्या दुसऱ्या खेपेस आम्ही चार दिवस शिरडीला राहिलो व श्रीबाबांच्या दर्शनाचे डोळे भरून सुख भोगले. काकड-आरती धरून एकही आरती आम्ही चुकविली नाहीं. नारळ व चादर यांची मागणी फकीरबाबांनी केली होती ती श्री बाबांचीच इच्छा असे मानून आम्ही दि. १ जानेवारी रोजी चादर समाधि-वर घातली, व नारळ बाबांच्या चरणी अर्पण केला. त्या दिवशी सायं-आरती-नंतर श्री. भोलानाथ समेळ यांचे समाधिमंदिरात भावगीत गायन झाले त्यावेळी श्री संस्थानच्या वतीने त्यांना श्रीफळ व एक रुपया मानधन देण्यात आले. जे श्रीफळ श्री. समेळ यांना देण्यात आले ते आम्हींच श्रीचरणी अर्पण केलेले होते. हे जेव्हा आमच्या लक्षांत आले तेव्हा आमचे डोळे अक्षरशः अश्रूंनी भरले. फकीरबाबांच्या रूपाने श्रीफळाची मागणी आपणच केली होती हेंच त्यानी आम्हाला अशारीतीने दाखवून दिले. असे जर आम्हीं मानले तर ते अस्थानीं होईल काय ?

गुरुवारी रात्रौ पालखी-उत्सवास हजर राहून शुक्रवारी दुपारच्या बसने मुंबईला निघण्याचा आम्ही बेत केला. पालखी उत्सवास नव्यानेच हजर राहात असल्याने पालखी-मिरवणूक कोणत्या दरवाज्याने चावडीत शिरते त्याबद्दलची अचूक माहिती आम्हाला नव्हती. त्यातच लोकांची फारच भीड झाल्याने आम्ही चावडी दरवाज्याच्या एका बाजूला राहावयाचे ठरविले. इतक्यात श्री संस्थानचा गणवेष धारण केलेला एक वृद्ध सेवेकरी आला व त्याने आम्हाला सांगितले की आता हा जवळचा दरवाजा उघडण्यात नेईल. तुम्ही सरळ आत जा. तुम्हांला श्रीबाबांची आरती अगदी जवळून दिसेल आणि खरोखरच तसे झाले. हा वृद्ध सेवेकरी कोण होता ?

शुक्रवारी सकाळी स्नानाच्या विधिनंतर आम्ही तीर्थ बाटलीत भरून घेतले व आता निघणार इतक्यात एका पुजाऱ्याने आम्हांला विचारले आज चालला ना, हा घ्या बाबांचा प्रसाद. असें म्हणन एक पेढा माझ्या हातावर ठेवला. पेढा आकाराने बराच मोठा होता. सकाळी स्नानविधि चालू असतो त्यावेळी सगळ्या वस्तू बाजूला काढून ठेवतात. अशावेळी हा एकच पेढा तेथे कसा राहिला व तो आम्हालाच का देण्यात आला ? आम्ही त्या दिवशी निघणार हे पुजाऱ्याला कसे कळले वगैरे पुष्कळसे प्रश्न आमच्या मनात आले पण ते अनुत्तरीतच राहिले. श्रीसाईबाबांचीच इच्छा होती आणि त्यांनी आम्हांला दीड महिन्याच्या अंतराने चिंडीसारखे ओढून शिरडीला नेले. हाच याचा अर्थ.

आणखी एक प्रश्न ज्याचे उत्तर अद्याप स्पष्टपणे मिळाले नाहीं तो हा की फकीरबाबा माझ्या मुलाला काय सांगणार होते? कदाचित हेच असेल की गेल्या खेपेस तुझे आईवडिल शिरडीला आले त्यावेळी तू आजारातून तेव्हाच उठल्याने येऊ शकला नाहीस. आता मी त्यांना थोड्याच दिवसानी परत तेथे नेणार आहे. तेव्हा हा योग चुकवू नकोस. हेच जर खरे असेल तर आमच्यासारखे धन्य आम्हीच. आपल्या भक्तांनी शिरडीला यावे व मनसोक्त तेथील आनंद उपभोगावा म्हणून श्रीबाबांची कोण ही धडपड!!

● ● ●


# श्री साईनाथ रोजनिशी

यंदा १ जानेवारी १९७६ रोजी थाटात प्रकाशित झाली.

– भगवान श्रीसाईबाबांचे समाधिमंदिरातील सिंहासनावर अधिष्ठित असे पंचरंगी बहारदार संग्राह्य छायाचित्र.

– श्रीबाबांचे संक्षिप्त चरित्र, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीत काय काय पहाल, बाबांचे समकालीन संत, बाबांचे बोल, शिर्डीतील प्रमुख उत्सव.

बाबांच्या तिन्हीत्रिकाळ होणाऱ्या आरत्या इ. इ. भरपूर माहिती.

– आकर्षक वेष्टन, संग्राह्य माहिती, सुबक कलाकृति

– संग्राहयक रोजनिशी.

# वाऱ्यावरचे विचार

## हौद — १६

— द. शं. टिपणीस, (ठाणे)

जुन्या गणितातील दोन उदाहरणे (गोखले वा छत्रे पहा) पहिले एका हौदास दोन तोटघा आहेत. पहिल्या तोटीने मिनिटाला दोन गॅलन पाणी येते व दुसऱ्या तोटीने मिनिटाला एक गॅलन पाणी जाते तर तो किती वेळात भरेल? दुसरे एका तोटीने मिनिटाला तीन गॅलन पाणी येते व दुसरीने मिनिटाला एक गॅलन पाणी जाते तर तो हौद किती मिनिटात भरेल ? उत्तर सोप, येणे व जाणे यांच्या वजाबाकीने भरावयाचा तेव्हां भरेल. नाहीं भरला तर रिकामा होईल, आज नवीन गणित आले आहे. त्यात असली न्यूनाधिक्य (शिक्षण तज्ञांच्या मते) असलेली उदाहरणे नाहींत. वास्तविक गणित नवे जुने असू शकत नाहीं. परमेश्वर कधी नवा जुना असतो का? हो त्याचा अवतार नवा जुना असू शकेल. रामापेक्षा नवा अवतार हे ठीक. तसच गणिताचा अवतार म्हणजे पुस्तकाचा अवतार झाला असेल तर ते जुने; दुकानांतून नुकतेच आणले असेल तर नवीन हे बरोबर असो. वास्तविक या हौदात अध्यात्म बुडालेला आहे तो वर काढून नाविन्य निर्माण करायचे सोडून गणितालाच गचांडी दिली हे काही बर नाहीं बुवा. यास्तव नाईलाजाने आम्हांलाच थोडं फार पाणबुड्याचे काम करावे लागत आहे. वरील प्रमाणे दोन तोटघाचे हौद कोटघावधि आहेत, रोज नवे हौद बांधले जात आहेत व जुने कोसळून पडताहेत पाणी येणाऱ्या तोटघा हौदास नसल्यास जीवनाचा तोटा होतो, प्रत्येक व्यक्तीच्या शरीराच्या आत बुद्धिचा हौद असतो. त्याला दोन तोटघा आहेत. एक स्मरण व दुसरी विस्मरण. एकीनें येत तर दुसरीनं गळतं, स्मरण अधिक व विस्मरण कमी असेल तर हौद भरेल म्हणजे ज्ञानवृद्धि होईल. विस्मरण अधिक असेल तर हौद रिकामा होईल मोकळा राहिल. बहुतेकांच्या हौदाची विस्मरण तोटी अधिक काम करते. संसाराच्या हौदालाही अशा दोन तोटघा असतात. आवक व जावक. जावक जास्तच होते. त्यामुळे आमच्या पदरी धन न राहता ऋण राहते. संसार धन करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे, कोणती तोटी सतत चालू ठेवावी व कोणती अधून मधून चालू ठेवावी याचे ज्ञान असणे व तसे करता येणे हा आहे. हौद (बॅंक) भरलेला असला व दोन्ही तोटघा बंद असल्या तरी वापर केल्यास तो हौद रिकामा होईलच. यास्तव आवकाची तोटी सतत निदान झिरपत तरी चालू ठेवली पाहिजे. जुन्या गणितातील हौदात बुडी मारल्यावर आमच्या हाती जे काहीं आले ते हे.